**दिनांक 13/03/2023**

# प्रसिध्दी पत्रक

आरोपी लोकसेवक श्री. अमरसिंह भजणसिंह ठाकूर, वय 50 वर्षे, व्यवसाय- नौकरी, पद-सहाय्यक फौजदार ब.नं.2119 नेमणूक- पोलीस स्टेशन सिटीचौक औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रक्कम 10000/- रुपये स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे बेगमपुरा, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव व पत्ता | :- | श्री.अमरसिंह भजणसिंह ठाकूर, वय 50 वर्षे, व्यवसाय- नौकरी, पद-सहाय्यक फौजदार ब.नं.2119 नेमणूक- पोलीस स्टेशन सिटीचौक औरंगाबाद शहर रा. न्यू पहाडसिंगपुरा, अमोदी हील, ई-8 औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 25000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 10000/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती शुभांगी सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात दोषारोप मध्ये मदत करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे विरुध्द पोलीस स्टेशन सिटीचौक औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल असून दाखल असलेल्या गुन्हयात दोषारोप मध्ये मदत करतो म्हणून आ.लो.से. श्री. ठाकुर यांनी तक्रारदार यांच्याकडे 25000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से.अमरसिंह ठाकुर यांनी तक्रारदार यांच्याकडे 25000/- रुपयाची लाचेची मागणी पंच साक्षीदारांसमक्ष केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि.13/03/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. अमरसिंह ठाकुर यांनी लाचेची रक्कम तडजोडी अंती 10000/- रुपये पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडून नवखंडा कॉलेज जवळ ज्युब्लीपार्क येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से. ठाकुर यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे बेगमपुरा औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधीक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शुभांगी सुर्यवंशी यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस अंमलदार राजेंद्र सिनकर, रविंद्र काळे, सुनिल बनकर, चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994

पोलीस उप अधीक्षक :- 9356115189


/

**(मारुती शंकर पंडित)**

पोलीस उप अधिक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,

औरंगाबाद.